सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**कार्यालयीन आदेश** **क्रमांक: १६/आस्था/मोटारकार/२०२४२५/१९२**

**स्पिड पोस्ट** **दिनांक : १७/१०/२०२४**

**पहा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२/विनियम, दिनांक १७/१०/२०२३**
**२) शासन ज्ञापन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, घबांअ-२०२४/प्र.क्र.३१/अर्थसंकल्प कक्ष, दि. ०८/१०/२०२४**

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेल्या या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था / कार्यालयामधील अधिकाऱ्यांना नवीन / जुनी मोटारकार खरेदी करण्यासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सदर अग्रिम उपरोक्त क्रमांक १ मधील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून व संदर्भ क्रमांक २ नुसार शासनाने उपलब्ध केलेल्या निधीतून मोटारकार अग्रिम मंजूर करीत आहेत. त्यांना खालील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

**( अ )** १. सुधारीत वेतन बँड नुसार ज्या राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे ५ वर्षाच्या सेवेनंतरचे मूळ मासिक वेतन रूपये ५०,०००/- किंवा अधिक आहे. अशा राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना या प्रयोजनार्थ अग्रिम अनुज्ञेय राहील.

२. नवीन मोटार कार खरेदीसाठी अग्रिमाची रक्कम अधिकाऱ्याच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या १८ पट किंवा रूपये १५,००,०००/- ( रूपये पंधरा लक्ष फक्त ) किंवा नवीन मोटार कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी अनुज्ञेय राहील.

३. जुनी मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिमाची रक्कम अधिकाऱ्याच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ९ पट एवढी किंवा रूपये ७,५०,०००/- ( रूपये सात लक्ष प्रन्नास हजार फक्त ) किंवा जुन्या मोटार कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी कमी असेल तेवढे अग्रिम अनुज्ञेय राहील.

४. सदर अग्रिम मंजूरीच्या दिनांकापासून १ महीन्याच्या आत अग्रिम धारकाने खरेदी केलेल्या वाहनाच्या उत्पादनाचे वर्ष,खरेदीची तारीख व नोंदणीचे कागदपत्रे शासनास सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून मुंबई वित्तिय नियम-१९५९ मधील नियम १२४ ( बी ) तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरण्याऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

५. मोटार कार अग्रिमाची व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत मोटार कार शासनाकडे गहाण राहील. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांस गहाण खतामध्ये मोटार कारचा मेक ( MAKE ), मॉडेल ( MODEL ) आणि चेसिस क्रमांक ( CHASSIS NO ) स्पष्टपणे नमूद करण्यात येवून त्यांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून तीन महिन्याच्या आत कार्यालयास सादर कराव्यात तसे न केल्यास संबंधित संस्था / कार्यालय प्रमुख जबाबदार राहील. नवीन किंवा जुनी मोटार कार अग्रिम धारककडून नियमानुसार आवश्यक ते विहित नमुन्यातील करारपत्र (नमुना -२० ), गहाण बंधपत्र ( नमुना -२१, २१ए ), दुय्यम बंधपत्र ( नमुना-२२ ) व प्रतिभूती बंधपत्र ( नमुना-२२ ), व प्रतिभूती बंधपत्र ( नमुना-२२ ए ), घेण्यात यावीत.

६. मोटार कार अग्रिम वितरीत केल्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसुलीस सुरूवात करण्यात यावी.

७. शासकीय विमा निधीकडे मोटार कारचा स्वखर्चाने शासकीय विमा उतरविण्यास यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिमाधारकाने दक्षता घ्यावी. तसेच त्याची एक प्रत कार्यालयास सादर करावी.

८. संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यांत येते की, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन मोटार कार खरेदीसाठी मंजूर केलेल्या अग्रिमाची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यांत यावी.

९. तसेच अग्रिम धनाची रक्कम मंजूर केलेल्या आदेशाचा क्रमांक दिनांक मंजूरीची रक्कम, प्रमाणक क्रमांक याबाबतचा तपशील संचालनालयास सादर करावा.

**( ब )** १. नवीन मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची १०० समान मासिक हप्त्यात वसूली करावी व त्यानंतर व्याजाची वसूली ४० मासिक हप्त्यात करावी.

२. जुनी मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची ५० समान मासिक हप्त्यात वसूली करावी व त्यानंतर व्याजाची वसूली २० हप्त्यात करावी. मात्र एखादा अधिकारी निवृत्त होईपर्यंतच्या कालावधीत जर वरील रक्कम व त्यावरील व्याज हे जर नमुद केलेल्या हप्त्यामध्ये वसूल झाले नाही तर बाकी रक्कम व त्यावरील व्याज त्यांना देय असलेल्या मृत्यु नि सेवा निवृत्ती उपदान, गट विमा योजना, रजेचे रोखीकरण इत्यादी अनुज्ञेय रकमे मधून अथवा त्यांच्या वारसदारानां शासनाकडून देय असलेल्या रकमेतून वसूल करण्यात यावे.

**( क )** १. व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिम प्रकरणी व्याजाची परिगणना १०% या दराने करावी.

२. तसेच अग्रिम धनाची रक्कम मंजूर केलेल्या अग्रिमाच्या पत्राचा क्रमांक, दिनांक व प्रमाणक क्रमांक याबाबतचा तपशिल या संचालनालयास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

या कारणासाठी होणारा खर्च "उच्च व तंत्रशिक्षण विभाग-मागणी क्रमांक डब्ल्यू-९--७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे-(००)२०२,(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० १५३ ९)"५५ आगाऊ रक्कम या शिर्षाखाली चालू वर्षी म्हणजेच सन २०२४-२५ साठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानाप्रमाणे खर्ची टाकण्यांत यावा. सदर देयके लवकरात लवकर पारीत करुन घेण्यांत यावीत.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :-**

१. कोषागार / उपकोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, लातूर / जालना /नांदेड / हिंगोली ( मानार्थ ) ( संबंधित संस्था प्रमुखांमार्फत )
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यांत येते की, त्यांच्या विभागांतर्गत वाटप करण्यांत आलेले अनुदान खर्ची पडल्याबाबतची (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.
३. प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना / नांदेड / हिंगोली अ. क्र. २ ते ४ यांना कळविण्यात येते की, अनुदान खर्ची पडल्यानंतर लगेचच त्याबाबतचा तपशिल (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा.
५. संचालक,विमा संचालनालय, म्हाडा बिल्डिंग (गृहनिर्माण),पहिला मजला, खो.क्र. २६४, वांद्रे (पूर्व), मुं-५१.
६. संबंधित अधिकारी / कर्मचारी. (संबंधित संस्था / कार्यालयप्रमुखामार्फत)
७. कार्यासन क्रमांक : १५ /१६ मुख्य कार्यालय, मुंबई.

(कार्यालयीन आदेश क्रमांक :१६/आस्था/मोटारकार/२०२४-२५/ १९२, दिनांक : १७/१०/२०२४ सोबतचे परिशिष्ठ)

**मोटारकार अग्रिम २०२४-२५**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालयाचे नांव | अग्रिम रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. जयराम चंदु राठोड | अधि. यंत्र अभि. | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | १५,००,०००/- |
| २. | श्री. उमेश सर्जेराव हिवराळे | अधि. यंत्र अभि. | शासकीय तंत्रनिकेतन, जालना | ११,००,०००/- |
| ३. | श्रीम. आशा विश्वासराव कदम | प्रबंधक | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ९,२७,०००/- |
| ४. | श्री. तुषार संभाजीराव परोडवाड | अधि. अणुविद्युत अभि. | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | १५,००,०००/- |
| ५. | श्रीम. शेख मुनइझा झरिन रहुप | अधि. अणुविद्युत अभि. | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | १४,००,०००/- |
| | (अक्षरी एकूण रक्कम रुपये चौसष्ठ लाख सत्तावीस हजार फक्त) | | | ६४,२७,०००/- |

उपरोक्त परिशिष्ठास अनुसरुन संबंधित संस्था प्रमुखास पुढीलप्रमाणे अनुदान सुपूर्द करण्यांत येत आहे. त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त परिशिष्ठात नमूद केल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना आपल्या स्तरावर प्रदान करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या संचालनालयास सादर करण्यांत यावा.

| मोटारकार अग्रिम संस्थानिहाय वाटप करण्यांत आलेले एकूण अनुदान (सन २०२३-२४) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम (रुपये) |
| १ | प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | १५,००,०००/- |
| २ | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना | ११,००,०००/- |
| ३ | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ९,२७,०००/- |
| ४ | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | २९,००,०००/- |
| | (अक्षरी एकूण रक्कम रुपये चौसष्ठ लाख सत्तावीस हजार फक्त) | ६४,२७,०००/- |

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.